जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल .cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २१.०२.२०२६**

'' गुन्हे शाखा, वागळे घटक ५ कडून चोरीस गेलेले विविध कंपन्यांचे ३० मोबाईल जप्त ''

कासारवडवली पोलीस स्टेशन,ठाणे शहर गु.र.नं १०२/२०२६ भा.न्या.सं कलम ३३१(४), ३०५ अन्वये दाखल गुन्ह्याचा गुन्हे शाखा, वागळे घटक ५ तपास करीत असताना, दिनांक १९/०२/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार गुन्ह्यातील आरोपी नामे अकबर उर्फ पापा हा स्वत:चे अस्तित्व लपवून नायगाव पुर्व चिंचोटी गाव, तलावाचे जवळ, जि. पालघर येथे राहत असल्याची खबर मिळाली होती. सदर बामतीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईमध्ये आरोपी नामे अकबर शौकत अली शाह, वय २८ वर्षे, रा. चिंचोटी फाटा जवळील चाळ, नायगाव पुर्व, जि. पालघर मुळ रा. गाव-भरोटिया बाजार, ठाणा-डुमरीगंज, जिल्हा-सिध्द्रार्थनगर, उत्तरप्रदेश यास नायगाव पुर्व चिंचोटी गाव, तलावाचे जवळील चाळीमधील एका खोलीमधून, अटक करण्यात आली असून, तो राहत असलेल्या खोलीची झडती घेतली असता त्यामधून विवो, सॅमसंग, रिअलमी, रेडमी, ओपो अशा वेगवेगळया कंपनीचे ५,२९,१०१/- रूपये किंमतीचे एकुण ३० मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. सदर मोबाईल हे कासारवडवली पोलीस स्टेशन, जि.ठाणे. गु.र.नं १०२/२०२६ भा.न्या.सं कलम ३३१(४), ३०५ मध्ये चोरीस गेलेले मोबाईल असून, गुन्हे शाखा, वागळे घटक ५ कडून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/श्री.जगदिश गावीत हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमरसिंह जाधव, सहा पोलीस आयुक्त (शोध १ गुन्हे) श्री.शेखर बागडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा घटक ५ वागळे ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सलील भोसले, सपोनि श्री.जगदिश गावीत, पोना/उत्तम शेळके, रघुनाथ गार्डे, तेजस ठाणेकर, पोकॉ/निलेश शेडगे या पथकाने केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर